# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/उदयान/ ६९८ /२०२४-२५ दिनांक :- १३/१२/२०२४

प्रति,
मा. सिस्टम मॅनेजर
माहिती व तंत्रज्ञान विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय:- दि.11 डिसेंबर 2024 रोजीच्या नवराष्ट्र वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या जाहिरातीबाबत प्रेसनोट प्रसिध्द करणेबाबत**

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कोपरा गाव, भाईंदर (प.) येथील खाजगी जागेतील 50 वर्ष जुन्या 400 पेक्षा अधिक झाडांना जहर देवून ठार करण्यात आले असून संबंधीतावर कोणतीही ठोक कारवाई करण्यात आली नसल्याबाबतचे वृत्त दि.11 डिसेंबर 2024 रोजीच्या नवराष्ट्र वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या जाहिरातीबाबत सोबत जोडलेली प्रेसनोट मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- प्रेसनोट प्रत.

HSM
(हंसराज मेश्राम)
उप मुख्य उद्यान अधिक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

E:\2024-25\Lettar all/Lettar

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान विभाग

## // प्रेस नोट //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कोपरा गाव, भाईंदर (प.) येथील खाजगी जागेतील 50 वर्ष जुन्या 400 पेक्षा अधिक झाडांना जहर देवून ठार करण्यात आले असून संबंधीतावर कोणतीही ठोक कारवाई करण्यात आली नसल्याबाबतचे वृत्त दि.11 डिसेंबर 2024 रोजीच्या नवराष्ट्र वर्तमान पत्रात प्रसिध्द झाले आहे.

सदर बातमीमध्ये तथ्य नसून मनपामार्फत मौजे डोंगरी कोपरा गाव येथील खाजगी जागेबाबत प्रत्यक्ष पाहणी करुन महानगरपालिकेमार्फ़त रितसर पंचनामा करण्यात आलेला आहे. तसेच सदर जागेतील झाडे तोडल्याबाबत अज्ञात व्यक्ती विरोधात महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 वृक्ष संरक्षण आणि संवर्धन नियम 2009 सह शासन आदेश, अधिसुचना चे प्रकरण 8 कलम 21 (1) अन्वये संबधित पोलीस ठाणे येथे दि.15/07/2024 रोजी नियमानुसार एन.सी.आर. दाखल करण्यात आलेला असून पुढील कार्यवाही संबधीत पोलिस ठाणे यांचेकडून सुरू आहे.

Scanned with OKEN Scanner